• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३३ • मंगळवार, दि. ५ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 333 • Tuesday 5 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची सुनावणी लांबणीवर

**नागपूर । वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी १६ एप्रिलपर्यंत लांबणीवर पडली आहे. मिंधे सरकारच्या ४ ऑगस्ट २०२२च्या अध्यादेशामुळे मागील दोन वर्षे या निवडणुका रखडल्या आहेत. यामध्ये मुंबई महापालिकेसह २३ महापालिका, २५ जिल्हा परिषदा, २८४ पंचायत समित्या, २०७ नगरपालिका व १३ नगरपंचायतींचा समावेश आहे. २०२१मध्ये महाविकास आघाडी सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्य संख्येत वाढ केली होती. त्याआधारे राज्य निवडणूक आयोगाने प्रभागरचना, आरक्षण तसेच मतदार यादीची कार्यवाही पूर्ण केली होती. मात्र नंतर सत्तेत आलेल्या मिंधे सरकारने ४ ऑगस्ट २०२२ रोजी अध्यादेश काढला आणि राज्य निवडणूक आयोगाची ती कार्यवाहीच रद्द केली. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका खोळंबल्या आहेत.

## महाराष्ट्राच्या जनतेला ठाकरेंचे नेतृत्व मान्य

**मुंबई । वृत्तसेवा**

केंद्रासह राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या विरोधात प्रचंड नाराजीचा सुर उमठू लागला असून त्याचे पडसाद दापोली विधानसभा मतदार संघात दिसू लागले आहेत. भाजपा आणि शिंदे गटातील पक्षाचे कार्यकर्ते हे ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षातून बाहेर पडत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षात मोठया संख्येने जाहीर प्रवेश करू लागले आहेत त्यामुळे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या बाजूने दापोली विधानसभा मतदार संघात वातावरण तयार होवू लागल्याने हा शिवसेना पक्षासाठी शुभ संकेत मानला जात आहे



तर सत्ताधाऱ्यांना ही धोबी पछाड असल्याचे दापोलीतील नाक्या नाक्यावर खुलेआम चर्चा सुरू आहे. दापोली विधानसभा मतदार संघातील खेड या तालूक्यातील फुरूस या लोकसंख्येने मोठया असलेल्या गावातील नुकत्याच झालेल्या सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेतील मोठया पक्ष प्रवेशनंतर शनिवारी दुस-याच दिवशी दापोली तालूक्यातील हर्णे आणि अडखळ जईकर या महसुली गावातील शेकडो शिंदे गटातील कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी सध्या असलेल्या आप आपल्या पक्षाला शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे ) पक्षात माजी आम. संजय कदम यांच्या नेर्तृत्वावर विश्वास व्यक्त करत माजी जि.प. अध्यक्ष तसेच युवासेना राज्य कार्यकारणी सदस्य विक्रांत भास्करशेठ जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हर्णे येथे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केल्याने केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी पक्षाला बसलेली ही मोठीच चपराक मानली जात आहे. दापोली तालूक्यातील हर्णे या गावासह अडखळ जुईकर मोहल्ल्यातील शिंदे गटातील प्रमुख कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी भाजपात कार्यरत असलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे ) पक्षात जाहीर प्रवेश केल्याने या पक्ष प्रवेशामुळे शिंदे गटासह भाजपाला मोठे भगदाड पडले आहे.

## शिक्षण दर्जेदार, तितकी विकासाची शाश्वती -आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण हे गरीबी आणि बेरोजगारी दूर करण्याचे सर्वात मोठे आणि प्रभावी साधन असून शिक्षण जितके जास्त आणि दर्जेदार असेल तितकी विकासाची शाश्वती असते. असे मत आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवार (दि.४) रोजी बीड शहरातील अशोक नगर भागातील जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोली लोकार्पण कार्यक्रमात व्यक्त केले. बीड शहरातील अशोकनगर भागातील जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोली लोकार्पणाचा सोमवार (दि.४) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी आ.क्षीरसागरांच्या हस्ते नवीन बांधकाम झालेल्या वर्गखोलीचे लोकार्पण करण्यात आले. तसेच याठिकाणी आणखी एक नवीन वर्गखोली बांधकामाचे उद्घाटनही करण्यात आले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, या भागातील नागरिक, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



## आजी-माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांचा आज राष्ट्रवादीत होणार दाखल

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या विकासाची धुरा यशस्वीपणे सांभाळणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हात बळकट करण्यासाठी बीड शहरातील तरुण, अनुभवी आजी-माजी नगरसेवक आणि नगरपालिकेत उपाध्यक्ष, सभापतीपद भूषवलेले ज्येष्ठ नेते मोईन मास्टर यांच्यासह फारूक पटेल अमर नाईकवाडे जलील पठाण आदींचा गट आज दि.५ मार्च रोजी मुंबईत मंत्रालयासमोरील महिला आर्थिक विकास महामंडळ सभागृहात अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. ३०० वाहनांचा ताफा घेवून पटेल, नाईकवाडे मुंबईकडे रवाना झाले आहेत. या कार्यक्रमात तब्बल १७०० कार्यकर्त्यांचाही पक्ष प्रवेश होणार आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुडे, माजी आ.अमरसिंह पंडीत यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती असणार आहे. मुंबईत या पक्ष प्रवेश सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून तीनशे वाहनांचा ताफा आज सकाळीच मोठ्या उत्साहात मुंबईकडे रवाना होणार आहे. या पक्ष प्रवेशाच्या निमित्ताने पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. गेल्या काही दिवसांपासून बीडमधील बदललेल्या राजकीय परिस्थितीत आम्ही सर्व पदाधिकारी कोणतीही भूमिका न घेता संयम ठेवत 'वेट अँड वॉच' भूमिकेत राहिलो. अशावेळी राज्यातील जनतेच्या विकासासाठी काम करणारे सक्षम नेतृत्व अजितदादा पवार यांचे नेतृत्व स्वीकारण्याचा निर्णय आम्ही घेतला. यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे व माजी आमदार अमरसिंह पंडित या नेत्यांनी हा पक्ष प्रवेश सोहळा घडून आणण्यासाठी पुढाकार घेतला. आज तो प्रत्यक्षात साकारत असल्याने आम्हाला आनंद असल्याच्या प्रतिक्रिया पदाधिकार्यांनी व्यक्त केल्या आहेत. पक्षप्रवेश सोहळ्यासाठी तब्बल ३०० वाहनांचा ताफा घेवून पटेल, नाईकवाडे मुंबईकडे रवाना झाले आहेत. जनतेच्या विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी अजितदादांचे नेतृत्व सक्षम असून राज्याचे विकासाचे त्यांचे असलेले व्हिजन समोर ठेवून आम्ही पक्षात प्रवेश करत असल्याच्या प्रतिक्रिया या सर्व पदाधिकार्यांनी व्यक्त केल्या आहेत.बीड नगरपालिकेत अनेकवर्ष काम केलेली ही तरुण आणि अनुभवी पदाधिकार्यांची फळी सर्वसामान्यांच्या घरातून पुढे आलेली आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना स्वतःच्या क्षमतेने सिद्ध झालेला हा मोठा गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल होत असल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेसला बीडमध्ये मोठी ताकद मिळणार आहे. बीड पालिकेचे माजी गटनेते फारुक पटेल यांच्यासह माजी बांधकाम सभापती अमर नाईकवाडे, मोईन मास्टर, माजी नगरसेवक जलील पठाण, प्रभाकर पोपळे, नसीम इनामदार, भैय्यासाहेब मोरे, शेख शाकेर, अशफाक इनामदार, गणेश तांदळे, शेख सादेक, अल्पसंख्यांक आघाडी माजी जिल्हाध्यक्ष बरकत पठाण, अक्रम बागवान, ऑल इंडिया मोमीन कॉन्फरन्स चे जिल्हाध्यक्ष शेख सादेक (अंबानी), शकिल (बिल्डर)खान, इलियास टेलर, अलिम कुरेशी, शेख युनुस, रफीक बागवान, अय्युब खान, शेख अजिम, सय्यद नदीम, बांधकाम कामगार संघटना जिल्हाध्यक्ष अलिम पटेल, रामदास सरवदे, सय्यद रहीम, संतोष क्षीरसागर, शेख इलियास, संभाजी काळे, भैय्या पवळे, बाळु धोत्रे हे सर्व आजी-माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकारी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत.तसेच १७०० कार्यकर्त्यांचाही यावेळी राष्ट्रवादीत प्रवेश होणार आहे. आज पक्ष प्रवेश करत असलेले हे सर्वच पदाधिकारी मागील काही महिन्यांपासून राजकारणापासून अलिप्त होते.

## सध्याचे सरकार हे गोळीबार सरकार

**मुंबई । वृत्तसेवा**

सध्याच्या काळात आपल्या आमदाराला सांभाळणे गरजेचे आहे, मावळे घालतात तसं चिलखत घालून त्यांना पाठवलं पाहिजे. त्या विधान भवनामध्ये आजकाल काहीही होतंय. सध्याचे सरकार हे गोळीबार सरकार आहे, अशा शब्दात राज्य सरकारवर कडाडून टीका केली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान गेल्याच आठवड्यात विधान भवनाच्या आवारात शिवसेनेचे मंत्री दादा भुसे आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्यात वाद झाला. याच मुद्यावरून नागरिकांमधून राज्य सरकारवर टिका होत असल्याचे दिसून येत आहे. शिवसेनेचे मंत्री भुसे आणि सेनेचेच आ.थोरवे यांच्यातील बोलाचालीवरून जोरदार टीका होत आहे.

## गेवराई तालुक्याला दुष्काळाच्या झळा

**गेवराई । प्रतिनिधी**

विहिरींनी तळ गाठल्याने फेब्रुवारीपासून गेवराई तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात दुष्काळसदृश निर्माण झाली. समाधानकारक पाऊस न झाल्याने माळराने वाळवंट झाली असून, पावसाळ्यात नदी-नाले खळखळुन वाहीलेच नाहीत. त्यामुळे गावखेड्यातील लहान मोठे पाझर तलावात भर पावसाळ्यात पाण्याचा थेंबही जमा झाला नाही. त्यामुळे पिण्याचे पाणी यासह जनावरांचा चारा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पावसाळ्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले पर्ययाने भूजल पातळीत समाधानकारक वाढ झालीच नाही. खरीपाचे पावसाअभावी उत्पन्न कमालीचे घटले.शिवाय रब्बी पिकांच्या भीजवणी करीता पाणी टंचाई बहुतांश गावात झाली.फेब्रुवारीच्या पहिल्याच आठवड्यात उजवा कालव्यात पाणी आवर्तन सोडण्यात आल्याने कालवा शिवारातील साधारण २०-२५ गावातील शेत सिंचनात थोडा दिलासा मिळाला.मात्र मार्च हिट सुरु होताच पुन्हा कालवा शिवारातील देखील विहीर, बोअरवेल पाणी पातळीत घट झाली आहे.कालव्यात आणखी दोन आवर्तन सोडण्यात आले तर या भागातील ऊस, फळबागा जिवंत राहणार अशा प्रतिक्रीया शेतक-यातून व्यक्त होत आहे.



## संपादकीय

# ‘ती’ ची सोबत

धान्याने भरलेलं चिपटं ओलांडून स्मिता ’पत्नी’ म्हणून लक्ष्मीच्या रुपात माझ्या घरी आली. तेव्हाच ’अर्धांगिनी’ या शब्दाचा बोध खऱ्या अर्थाने मला झाला. या घटनेला आज तेरा-चौदा वर्ष होऊन गेली. पत्नीच्या रुपात माझ्या घरी आलेली ’लक्ष्मी’ माझ्या घरात आणि जीवनात आली. जीवनात सोबती किंवा साथीदार चांगला लाभल्याने हा जीवन प्रवास सुखकर होतो. याची अनुभूती मी मागच्या चौदा वर्षांपासून घेतो आहे. प्रभुरामचंद्रांचा वनवास चौदा वर्षांचा होता. प्रभूच्या सेवेसाठी तत्पर असलेली ’सीतामाई’ हे सेवेचेच स्वरूप होते. प्रभूची सावली बनून सीतामाईने जशी अहोरात्र पतीसेवा केली ;अगदी तशीच पत्नी स्मिता माझी सेवा आजवर करत आली आहे. ’सावली’ हा शब्द इथे मी सोबत,सहवास या अर्थांनी योजिलेला आहे.व्यक्तीच्या सोबत सावली नेहमीच असते. प्रकाशाचा अभाव असेल तर आपल्याला सावली दिसत नाही. पण तिचं अस्तित्व हे सुप्त रीतीने व्यक्तीच्या अवती-भोवतीच असते. अगदी तसेच बऱ्याच वेळा जॉब मुळे पत्नी शरीराने दूर असते, पण मनाने मात्र सदैव सोबतच असते. दिवसभरातुन अनेक वेळा माझ्या मोबाईल फोनच्या कॉल हिस्ट्री मध्ये तिचे ’कॉल्स’ पडलेले असतात. रिकाम्या वेळेत ज्यावेळी मी कॉल बॅक करतो तेव्हा पलीकडून तिचा पहिला प्रश्न असतो; चहा,नाश्ता, जेवण केले आहे काय? कुठे आहात? काय करताय? अशा या प्रश्नांनी माझी आस्थेवाईक चौकशी करून फोन द्वारे जणू काळजी वहन करण्याचे कामच एक प्रकारे तिच्याकडून घडले जाते. त्या मोबाईल वरील आमच्या संवादातून दोघांनाही एक प्रकारची ऊर्जा अन नवचैतन्य प्राप्त होत असते. या संवादातलं शब्दांनी तुडुंब भरलेलं प्रेम दोघांच्याही हृदयात पाझरू लागते.पती-पत्नीचं नातं फुलण्यासाठी, वाढण्यासाठी अन आजन्म टिकण्यासाठी दोघातला संवाद नितांत गरजेचा असतो, याची अनुभूती माझ्या चौदा वर्षांच्या वैवाहिक जीवन प्रवासात आम्ही दोघांनीही अनेक वेळा अनुभवली आहे. हे नातं फुलण्यासाठी,टिकण्यासाठी संवाद जसा आवश्यक असतो.तसाच अनावधानाने पती-पत्नींच्या घरगुती, कार्यालयातील वा इतर अनेक कारणांनी निर्माण होणाऱ्या ताण-तणावामुळे दोघात होणारे वाद-विवादही हे पती-पत्नीचं पवित्र नातं घट्ट करण्यासाठीच घडून येत असतात. असा माझा तरी अनुभव आहे. त्याचे कारण असे की, वाद-विवादा नंतरचा पती-पत्नीमधील अबोलपणा, रुसवा-फुगवा यालाही एक अनामिक भाषा असते.जी उभयतांच्या हृदयालाच कळते. त्या अबोलपणातही परस्परांची घेतलेली काळजी, त्या काळजी पोटी फुललेले परस्परातील प्रेम रुपी फुल विशेष सुगंधी व टवटवीत दिसू लागते. आमची भांडणं बहुतेक करून एकाच कारणास्तव होतात. ते म्हणजे एकमेकांना वेळ न मिळणे.नोकरीच्या निमित्ताने दोघेही दिवसभर व्यस्त असल्याने बहुतांशी वेळा परस्परांना वेळ देणे शक्य होत नाही.शनिवार रविवार नातेवाइकांचे लग्न,वास्तुशांती, कथा कीर्तन, प्रवचने व त्यांचा अभ्यास किंवा इतर खासगी कामात बहुतेक वेळ जात असल्याकारणाने बहुतांशी वेळी भांडणाला निमित्त घडते. दोघेही दिवसभर व्यस्त असल्याने दोघांना परस्परांच्या सहवासाची फार गरज असते. त्यातही व्यग्र जीवनशैलीमुळे हल्ली परस्परांसाठी वेळ मिळणे कठीणच झालेले आहे. शनिवारचा वीकेंड आणि रविवारची सुट्टी आम्ही परस्परांसाठी दिलेली असते. त्यात आठवडाभरात घडून गेलेल्या विविध घडामोडी, भल्याबुऱ्या घटना किंवा दोघांच्या अन मुलांच्या हितासाठी आखलेले प्लॅन्स व त्यावरील साधक-बाधक चर्चा अशा विविध विषयावर विस्तारानं गप्पा, चर्चा,प्रसंगी कधी कधी भांडण आणि शेवटी चहाने गप्पांची सांगता होते. आम्हा पती-पत्नीमधील नाते जपण्यासाठी ’रात्रीचं जेवण’ आम्ही शक्यतो सोबतच घेतो. जेणेकरून अन्नाच्या प्रत्येक घासा बरोबर सुख-दुःख एकमेकांना वाटली जातील.त्यातूनच आम्हा उभयंता मधला पवित्र नात्याच्या स्नेहाचा,प्रेमाचा गोडवा आजन्मच नाही तर जन्मोजन्मी टिकेल. स्त्री ही क्षणाची पत्नी अन अनंत काळाची माता असते.’ या प्र.के.अत्रे यांच्या विधानातील पूर्वार्ध आणि उत्तरार्ध दोन्हीही तितकेच महत्त्वाचे आहेत. प्रजोत्पादन आणि कुटुंब निर्मिती व रक्षणासाठी विवाह संस्था अस्तित्वात आली. अन त्या विवाह संस्थेतून स्त्री ही कुणाची तरी पत्नी, आई,बहीण,मावशी आत्या आदी अनेक नात्यांनी स्त्री ही कुटुंब संस्था टिकवून ठेवण्यास आजतागायत यशस्वी झाली आहे. बहिण-भावाच्या पवित्र नात्या बद्दल साहित्यात पुष्कळ लेखन झाले आहे . आईबद्दल ही अनेक साहित्यिकांनी भरभरून लिहिले आहे.साधूसंतांनी सुद्धा संतसाहित्यातून आईची मोठीच महती गायली आहे. प्रियकर-प्रेयसी यांच्या प्रेमकथा तर हिर-रांजा पासून आजवर अमर प्रेमकथा म्हणून इतिहासाच्या पानांमध्ये अक्षरबद्ध झालेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने पती-पत्नींच्या नाजूक आणि पवित्र नात्यावर सकारात्मक लेखन तेवढेसे पाहायला मिळत नाही. पती-पत्नीमधील बेबनाव,त्यांचे वाद-विवाद,भांडणे, घटस्पोट याबद्दलचे लेखन आजवर मोठ्या चवीने लिहिलेले वाचायला मिळाले. परंतु पती-पत्नीच्या नात्यातील प्रेम,सहवास, काळजी, आपुलकी परस्परांच्या सुखासाठी त्यागाची भावना पाहिजे तेवढ्या प्रमाणामध्ये कथा-कादंबऱ्या तून वाचायला मिळाली नाही. म्हणूनच पतीची सावली बनून त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या,सासू-सासऱ्यांची मनोभावे सेवा करणाऱ्या,पतीच्या सुखदुःखात खंबीर साथ देणाऱ्या, पतीचे अर्धे अंग म्हणून भूमिका बजावणाऱ्या पत्नी रूपातील समस्त स्त्रीच्या स्त्रीत्वाचा जागर आणि आदर आज जागतिक महिला दिनी व्यक्त करण्याचा मानस या लेखातून करण्याचा माझा प्रयत्न आहे. तेव्हा आज जागतिक महिला दिनानिमित्त समस्त रणरागिनी बद्दल कृतज्ञता व मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करून लेखणीस विराम.

# तर शाळा-कॉलेजची मान्यता रद्द होणार -विभागीय शिक्षण मंडळ

**पुणे । वृत्तसेवा**

शिक्षण विभागातून मोठी बातमी समोर येत आहे. राज्य मंडळाकडून पाठविण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षाच्या उत्तर पत्रिका न तपासता परत केल्यास संबंधित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता रद्द करण्यात येईल असा कडक इशारा विभागीय मंडळाच्या अध्यक्षांनी दिला आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या लेखी परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू आहेतर १ मार्चपासून दहावीच्या परीक्षा सुरू आहेत. त्यामुळे वेळेत निकाल जाहीर करण्यासाठी उत्तरपत्रिकांची तपासणी वेळेत करावी अन्यथा मंडळाकडून संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. पेन्शन, वेतन, पदभरती या विविध मागण्यांकरिता राज्यातील शिक्षकांनी हा निर्णय घेतला आहे. शिक्षकांनी आपल्या समस्या सांगण्यासाठी यापूर्वीही आंदोलनं केली आहेत. तरी देखील शिक्षकांच्या समस्या सोडवल्या जात नाहीत. वारंवार आंदोलने करून केवळ आश्वासन मिळतात म्हणून शिक्षकांनी उत्तरपत्रिका न तपासण्याचा निर्णय घेतला होता.

# भिक्षेकरी महाराजाने महिलेवर शस्त्राने केला वार

**नागपूर । वृत्तसेवा**



भिक्षेकरी बाबाला भिक्षा न दिल्याच्या रागातून संतप्त झालेल्या बाबाने एक महिलेवर त्रिशूळने प्राणघातक हल्ला केला आहे. ठकीबाई सोनूजी हेकडे (६०) असे या वृद्ध महिलेचे नाव असून त्यांच्या पोटावर हा त्रिशूळने वार करण्यात आला आहे. ’ या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटना घडल्यानंतर ही बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरली असता, गावकरी एकत्र गोळा झालेत आणि गावातील मुख्य चौकातील इलेक्ट्रिक खांबाला या भिक्षेकरी बाबाला बांधून ठेवण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी ही माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन या बाबाला अटक करत पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. चिखलदरा तालुक्यातील वस्तापूर या गावात रविवारच्या पहाटेपासून उत्सव, भजनकीर्तन अश्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, दुपारपर्यंत गावात सर्व गावकरी आणि भक्तगण श्रीसंत गजानन महाराजांच्या कार्यक्रमात व्यस्त होते. असे असतांना, नेमके याच वेळेत दुपारी तीन वाजताच्या सुमारास एक अज्ञात भिक्षेकरी बाबा हातात त्रिशुळ आणि बगलेत भलेमोठे गाठोडे घेऊन गावात भिक्षा मागत होता. दरम्यान, भिक्षा मागत असताना गावातील सोनूजी हेकडे यांच्या घरी हा बाबा पोहोचला आणि त्यांने भिक्षेची तसेच पैशाची मागणी केली. त्यानंतर घरातील ठकीबाई हेकडे यांनी बाबाला भिक्षा दिली. मात्र, दिलेल्या भिक्षेत पैसे न दिल्यामुळे बाबाचे समाधान झाले नाही. त्यानंतर बाबाने वयोवृद्ध ठकीबाई यांना बळजबरीने पैश्यांची मागणी केली. मात्र त्यांनी नकार देताच या बाबाने त्यांच्या सोबत वाद घातला. त्यानंतर या वादातून संतप्त झालेल्या भिक्षेकरी बाबाने आपल्या जवळ असलेल्या त्रिशूलने महिलेच्या पोटावर वार करून त्यांना जखमी केले. यात ठकीबाई यांच्या पोटावर त्रिशूळचा वार केल्याने त्या जखमी झाल्या. भरदिवसा झालेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. परिसरात जमलेल्या नागरिकांनी या महिलेला तत्काळ जवळील आरोग्य केंद्रात नेऊन उपचार सुरू केले. त्यानंतर नागरिकांनी या भिक्षेकरी बाबाचा शोध घेऊन त्याला शोधून काढले आणि गावातील मुख्य चौकात असलेल्या खांबाला कापडाच्या साह्याने बांधून ठेवले. कालांतराने ही बाब पोलिसांना कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन बाबाला ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास चिखलदरा पोलीस करत आहेत.

# जालन्यात कापसाने भरलेली आयशर चोरटे गजाआड

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हयातील कापूस मालाविरूध्दचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मालाविरूध्द चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने ३ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथुन एक १०० क्विटल कापसाने भरलेले आयशर चोरी गेल्या बाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या कलम ३७९ भादंवि मधील अज्ञात गुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी लक्ष्मण बाबुराव गाढे (रा. भिवंडी बोडखा ता. अंबड जि. जालना) याने केला असुन तो त्याच्या साथीदारासह आयशरमधील कापुस भिवंडी बोडखा शिवारात वेगवेगळ्या वाहनात भरून विक्री करण्यास जात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यांनी भिवंडी बोडखा येथे जावुन पाहणी केली असता भिवंडी बोडखा शिवारात एका गायरानामध्ये चोरीस गेलेला एक लाल रंगाचे आयशर रिकाम्या अवस्थेत मिळाली. सदर आयशरमधील कापुस हा वेगवेळ्या वाहनाने पाचोड, गेवराई व अंबड येथे विक्रीसाठी नेला असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यांनी गेवराई हद्दीत उमापुर फाट्याजवळ दोन कापसाने भरलेले बोलेरो पिकअप चालकाने त्याचे नाव चालक बाबासाहेब कोंडिबा गायकवाड चालक रा. जुने पाचोड ता. पैठण जि. छ. संभाजीनगर व एक अशोक लिलैंडच्या चालकाने त्याचे नाव अलिम मसुद मनियार चालक रा. फैजलपुरा, पाचोड ता. पैठण जि.छ. संभाजीनगर व पाचोड येथुन कापसाने भरलेला एक महिंद्रा कंपनीचा मॅक्स बोलेरो पिकअप पांढऱ्या रंगाचे ज्याचा अंबड येथे व्यापाऱ्याकडे कापूस विक्री करीत असतांना एक टाटा कंपनीचा छोटा हत्ती त्याचा चालक नामे संतोष शिवाजी कोल्हे रा. शिवाजीनगर, पाचोड ता. पैठण जि.छ. संभाजीनगर असे वेगवेगळ्या ठिकाणाहुन चोरीस गेला १०० क्विटल कापुस व चोरीस गेलेले आयशर असे एकुण ३५लाख ५० हजार रूपयाच्या मुद्देमाल व तिन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यांनी ताब्यात घेतले. सदर कापुस विक्री करण्यासाठी गेलेले आरोपीतांनी विश्वासात घेवुन विचारपुस केली असतांना त्यांनी सदरचा कापुस हा आयशरसह लक्ष्मण बाबुराव गाडे रा. भिवंडी बोडखा ता. अंबड याने टेंभुर्णी येथुन चोरून आणला व आम्हास विक्री करण्यासाठी आमच्याकडे दिला होता असे त्यांनी कबुली दिली.

# लोकसभा निवडणुकीदरम्यान चलन वाहतुकीवर आता नियंत्रण शक्य

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

पुढील जवळपास दोन-अडीच महिने चालणाऱ्या लोकसभा निवडणुकीदरम्यान होणाऱ्या चलन वाहतुकीवर आता नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. बँकांच्या चलन व्यवहार केंद्रांतील प्रत्येक रोकड वाहतुकीला ‘क्यूआर कोड’ दिला जाणार असून एका विशेष ॲपद्वारे सुरुवातीच्या ठिकाणापासून गंतव्य ठिकाणापर्यंत चलनाचा माग ठेवता येणार आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात बँक किंवा पतसंस्थांमधील चलन असल्याचे भासवून पाठवण्यात येणाऱ्या काळय़ा पैशाला लगाम लावणे शक्य होणार आहे. ‘इलेक्शन सिझर मॅनेजमेंट सिस्टीम’ नावाचे हे ॲप असून लोकसभा निवडणुकीची अधिसूचना जाहीर होताच ते कार्यान्वित होणार आहे. या ॲपद्वारे निवडणूक अधिकारी, बँका, प्राप्तिकर विभाग आदी सरकारी यंत्रणांना चलन वाहतुकीवर देखरेख ठेवता येणार आहे. आचारसंहितेच्या काळात होणारी काळय़ा पैशाची देवाणघेवाण, मतदारांना प्रलोभने दाखवण्याचे प्रयत्न होताना दिसतात. त्याचवेळी पारदर्शक पद्धतीने एका बँकेतून दुसऱ्या बँकेकडे पाठवण्यात येणारी रोकड कारवाईच्या कचाटय़ात अडकते. मात्र, नवीन ॲपमुळे हा घोळ टाळता येणार आहे. चलन व्यवहाराच्या केंद्रामधून (करन्सी चेस्ट) निघालेली रक्कम आणि बँकांच्या शाखांपर्यंत तपासणी करणाऱ्या पथकाने आचारसंहितेत रक्कम जप्त केली, तर त्यांना संकेतांक दाखवून सुटका करवून घेता येईल. त्याचवेळी ‘क्यूआर कोड’ नसलेली रक्कम जप्त करून तातडीने कारवाई करणेही शक्य होईल. अनेकदा ग्रामीण भागातील पतसंस्था, सहकारी पेढय़ांमधील चलन असल्याचे भासवून चलन वाहतूक करण्यात येते. प्रत्यक्षात ती त्या वित्तीय संस्थेपर्यंत पोहोचतच नाही. मात्र, नवीन यंत्रणेमुळे सुरुवातीच्या ठिकाणापासून निघालेली रोकड गंतव्य स्थानी पोहोचल्यानंतर तिची अधिकृत नोंदही ठेवली जाणार आहे. निवडणुकीदरम्यान एक लाखापेक्षा अधिकच्या व्यवहाराची माहिती दैनंदिन प्राप्तिकर विभागाकडेही आपोआप दिली जाते. त्यामुळे चलन व्यवहार आणि एकाच खात्यातून अनेक खात्यांमध्ये रक्कम जात असेल, तर त्यावरही देखरेख ठेवण्याच्या सूचना जिल्हा अग्रणी बँकेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. उद्योग, बँकेचे अधिकारी, पोलीस, प्राप्तिकर, तसेच आर्थिक व्यवहारातील अनेकांना हे ‘ॲप’ उपलब्ध करून देण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांत छोटे व्यवहार भ्रमणध्वनीवर ॲपच्या आधारे केले जातात. मात्र, रोखीमधील मोठे चलन व्यवहार आता तपासता येणार आहेत. देशातील बहुतांश व्यवहार डिजिटल होत असताना लोकसभा निवडणुकीत त्यावरही लक्ष ठेवले जाणार आहे. गेल्या पाच राज्यांतील निवडणुकांमध्ये ‘चलन व्यवहारा’त मोठे बदल दिसून आल्याची माहिती निवडणूक आयोगाच्या विविध प्रशिक्षणांतून देण्यात आली आहे. दररोज बदलणारे चलन व्यवहार आणि निवडणुकांचा खर्च याचाही मेळ घातला जाणार असल्याचे अधिकारी सांगतात. या ॲपच्या आधारे सोन्या- चांदीच्या वस्तूंची खरेदी-विक्रीवाढही तपासता येणार आहे.

# तलाठी भरतीला लोकसभा निवडणुकांमुळे नियुक्त्या लांबणीवर?

**मुंबई । वृत्तसेवा**

तलाठी भरतीचा निकाल लागून दिड महिना झाला आहे. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर उमेदवारांना १५ दिवसात नियुक्ती मिळण्याची अपेक्षा असते; परंतु आता जवळपास दिड महिना उलटून गेला तरीही उमेदवार नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. पेसा क्षेत्रातील निकालही अजून लागला नाही. याबाबत उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच महसूल विभागाला निवेदन दिले आहे. तलाठी भरतीतील अनेक उमेदवार इतर परीक्षेतही निवड झाले आहेत ते सुरक्षिततेसाठी तिथेही जागा अडवत आहेत. अशातच समोर येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी सर्वांना नियुक्त्या मिळाव्यात; अशी मागणी जोर धरत आहे. राज्य शासनाने पेसा क्षेत्र वगळून तलाठी भरतीची प्रक्रिया पूर्ण केली आहे. पेसा भागात येणाऱ्या उमेदवारांचा निकाल अद्याप जाहीर केलेला नाही. मात्र,उर्वरित भरती प्रक्रिया सुरू केली असून केवळ नियुक्ती देण्याची प्रक्रिया बाकी आहे. तरीही तलाठी पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती का दिली जात नाही; याबाबत उमेदवारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. आचारसंहिता जाहीर झाल्यास नियुक्त्या लांबणार आहेत. त्यामुळे अनेक उमेदवार याबाबत शासनाला व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत आहेत. पेपर फूटीच्या घटनांमुळे तलाठी भरती वादात सापडली असल्याचे बोलले जात होते. मात्र,राज्य शासनाने निकाल जाहीर करून उमेदवारांची निवड यादी जाहीर केली. तसेच सर्व उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केली. मात्र,अद्याप उमेदवारांना नियुक्त्या दिल्या गेल्या नाहीत. आता पुढील काही दिवसात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आचारसंहितेपूर्वी नियुक्त्या द्याव्यात,अशी मागणी तलाठी भरतीत निवड झालेल्या उमेदवारांकडून केली जात आहे. परंतु, तलाठी भरतीत गोंधळ झाल्याने स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने न्यायायलात याचिका दाखल केली आहे. येत्या मंगळवारी (दि.५ मार्च) त्यावर सुनावणी होणार आहे. परिणामी तलाठी पदावरील नियुक्त्या लांबणार,असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बहूचर्चित तलाठी भरतीमध्ये घोटाळा झाला, असा आरोप करत स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने न्यायालयात याचिका दाखल केली.तत्पूर्वी पेपर पुटीचे अनेक पुरावे शासनाकडे सादर करण्यात आले.तसेच पोलिसांनी सुध्दा याबाबत गुन्हे दाखल केले आहेत.त्यामुळे भरती रद्द करून पुन्हा भरती घ्यावी,अशी मागणी समन्वय समितीकडून केली जात आहे.न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मंगळवारी सुनावणी असून शासनाला त्यावर आपले म्हणणे मांडावे लागणार आहे.त्यामुळे शासन यावर काय बाजू मांडणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.


## जाहिर नामा

**मा.श्रीमती एस.बी.बेग सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दि.अर्ज क्र. १५८/२०२४**
**अंकुश वि.निरंक**

**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

**अर्जदार : १) अंकुश पि. किसन सपकाळ, वय ६५ वें, धंदा शेती, रा. अवलपूर, ता.जि.बीड**

**विरूध्द** **निरंक**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे गणेश पि. रूस्तूम घोडके** हे राहणार राजुरी घोडका, ता.जि.बीड हे दिनांक १९/१०/२०२३ रोजी जीवन अमृत हॉस्पिटल, औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे **मयत नामे गणेश पि. रूस्तूम घोडके** यांचे आजोबा (आईचे वडील) आहेत. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरिता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की,सदरहू अर्जदार सदहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहू **मयत गणेश पि. रूस्तूम घोडके** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०३/२०२४ आहे.**

**आज दिनांक २९/१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

**क.लिपीक**
**सह दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**

**मार्फत ॲड. शेळके वाय.आर.**

**कोर्टाचा शिक्का**

**आदेशावरून स्वाक्षरीत अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

# जिल्हाधिकाऱ्यांच्या वाहनावर हल्ला करणारे वाळूमाफिया जेरबंद

**जालना । वृत्तसेवा**
अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करणाऱ्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या वाहनावर वाळू माफियांनी केलेल्या हल्ला प्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली असून त्यांची चार दिवसांच्या पोलिस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी एक स्कॉर्पिओ जप्त करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पोलीस तपास सुरू आहे.जिल्ह्यात अवैध वाळू उपसा प्रकरणी कडक कारवाई करण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार व त्यांचे पथक बुधवारी रात्री भादली शिवारातील गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी गेले होते. या पथकाने तीन हायवा, तीन ट्रॅक्टरसह एक जेसीबी पकडला. ही वाहने घनसावंगी पोलिस ठाण्याकडे नेताना रात्रीच्या वेळी हायवा वाळू माफियांनी पथकावर दगडफेक करत हल्ला केला. या हल्ल्यात पथकाच्या वाहनाचे नुकसान झाले होते.तर काही कर्मचाऱ्यांना मार लागला.या प्रकरणात आरोपींविरुद्ध घनसावंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास करून चार जणांना अटक केली आहे. या आरोपींची चार दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पोलीस पुढील तपास करीत असून जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून कडक कारवाई केली जाईल, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# संघाचा निष्ठावंत माणूस तरीही लोकसभेची उमेदवारी नाही

**मुंबई । वृत्तसेवा**
महाराष्ट्रातील शिक्षक आमदार आणि जनता दल युनायटेडचे राष्ट्रीय महासचिव कपिल पाटील यांनी जेडीयूला सोडचिट्टी देत समाजवादी गणराज्य पार्टी असे अशा नवीन पक्षाची स्थापना केली आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षाचे नामकरण करण्यात आले. यानंतर उपस्थितांना संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने जाहीर केलेल्या पहिली यादीवर निशाणा साधला. त्यांनी म्हटले की, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे संघाचा निष्ठावंत आहेत, पण त्यांचं नावं यादीत नाही. उद्धव ठाकरे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने पहिला यादी जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं नाव भाजपाच्या यादीत आहे. मोदी आणि शाह हे नाव आम्हाला माहीत नव्हतं. प्रमोद महाजन यांनी आम्हाला त्यांची ओळख करून दिली. महाजन यांच्यासोबत नितीन गडकरी आले. गडकरी यांनी ५५ उड्डाणपुलं बांधली. ते संघाचे निष्ठावंत माणूस आहेत, पण त्यांचं नाव यादीत नाही. मुंबईतील सिंह यांचं नाव यादीत पण गडकरींचं नाव नाही, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आठवर्षांपूर्वी सव्वा लाख कोटीचं पॅकेज मोदींनी बिहारला जाहीर केलं होतं. त्यापैकी किती पैसे आले, असा प्रश्न मला नितीश कुमार यांना विचारायचा आहे. जर पैसे आले असतील तर आम्हीसुद्धा तुमच्यासबत येतो. मोदींकडून फसवी फसवीचा खेळ सुरू आहे. आम्हीही दोनदा मोदींच्या भूलथापांना बळी पडलो. पदरात काय पडलं? धोंडे पडले असते तरी ठीक होतं. कारण धोंड्याला शेंदूर फासलं तर देव तरी होतो. यांचं काय? नुसतं गेल्या दहा वर्षांमध्ये नामांतर झालेली आहेत. योजनांची नावं बदला, स्टेशनचं नाव बदला, शहरांचं बदल करतात, दोन शहरांचं नावं मी बदलली याचा मला अभिमान आहे. एकाचं छत्रपती संभाजी नगर केलं आणि दुसरं धाराशिव केलं. काँग्रेस आणि राष्ट्रवादीने मला पाठिंबा दिला होता. पण आता भाजपा नुसतं योजनांचं किंवा गावांचं नाव बदलत आहे. आता यांनी जुमल्याचं नाव सुद्धा गॅरंटी म्हणून केलेलं आहे, असा टोलाही उद्धव ठाकरे यांनी लगावला. उद्धव ठाकरे म्हणाले की, जनतेमध्ये भाजपाविरोधात असंतोष आहे. शेतकरी कामगार विद्यार्थी सगळे आक्रोश करत आहेत. सगळ्यांच्या मनात एकच प्रश्न ईव्हीएमच काय होणार? ईव्हीएममध्ये घोटाळा करतील आणि ते जिंकतील, अशी लोकांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे जर भाजपाने ईव्हीएम घोटाळा केला तर जनतेमध्ये असंतोष भडकेल. ईव्हीएमचा घोटाळा करून सत्तेत याल तर देशात असंतोषाचा भडका उडेल, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.

# आमदाराच्या कारचा भीषण अपघात

**मुंबई । वृत्तसेवा**
राज्यातील राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला तर दुसरीकडे शिंदे गटातील अनेक नेते वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत येत आहे. शिंदे गटाचे अलिबागचे शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी हे ही आता त्यांच्या कार अपघातामुळे चर्चेत आले आहेत. आमदार महेंद्र दळवी यांच्या कारने एका दुचाकीस्वाराला धडक दिल्याने त्यांच्या ड्रायव्हरविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. हा अपघात मुरुड तालुक्यातील उसडीजवळ घडला आहे. अलिबागमधील शिंदे गटाचे आमदार असलेले महेंद्र दळवी यांच्या कारने दुचाकीस्वाराला उडवल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. हा अपघात मुरुडजवळ असलेल्या टोलनाक्यावर झाला होता. या प्रकरणी आता ड्रायव्ह धनेश सणकर याच्याविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महामेट्रोचा नागपूरकरांचा प्रवास होणार स्वस्त

**नागपूर । वृत्तसेवा**
उपराजधानी नागपूरात मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना महामेट्रोने मोठा दिलासा दिला आहे. शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांच्या उन्हाळ्याच्या सुट्या लक्षात घेता, महामेट्रो नागपूरने प्रवासी भाड्यामध्ये बदल केले आहे. आज १ मार्च पासून हे नवे दर लागू होतील. हे दर सध्याच्या भाड्याच्या तुलनेत ३३ टक्क्यांनी कमी असल्याचे महामेट्रोकडून सांगण्यात आले आहे. सोबतच या नव्या दरात देखील विद्यार्थ्यांना ३० टक्के सवलत देण्यात येणार आहे. या सवलती दरामुळे मेट्रोचा प्रवास अधिक सुखकर होणार असून नागपूरकरांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. या सवलती अंतर्गत सीताबर्डी इंटरचेंज ते लोकमान्यनगरपर्यंतचा प्रवास आता ३० रुपयांऐवजी २५ रुपये आणि विद्यार्थ्यांना ३० टक्के सवलतीसह १८ रुपये द्यावे लागतील. प्रवाशी संख्या वाढविण्याचा उद्देशाने महामेट्रोने प्रवाशांकरिता 'कॅश बॅक'ची संकल्पनादेखील राबविण्यात येणार असून ही योजना लवकरच लागू होणार आहे. या सेवेअंतर्गत एका महिन्यात महाकार्ड वापरणाऱ्या प्रवाशाला मेट्रोने प्रवास करत तिकीट दराच्या माध्यमातून एकूण ८०० रुपयांपेक्षा जास्त खर्च केल्यास त्याला कॅश बॅकच्या माध्यमातून १० टक्के पॉइंट मिळेल.

# नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणी आणखी एकाला अटक

**नगर । वृत्तसेवा**
नगर अर्बन कर्ज घोटाळा प्रकरणी सावेडी येथील आणखी एकाला आर्थिक गुन्हे शाखेने रविवारी ( दि. ४ ) अटक केली. प्रभाकर वैकर ( रा.रासने नगर सावेडी अहमदनगर ) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणाचा तपास शहर विभागाचे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. अमोल भारती यांनी आरोपींचा शोध घेण्याची मोहीम सुरू केली असून, त्यांच्या पथकाने सवेडी उपनगरातील आणखी एकाला अटक केली. या प्रकरणातील इतर आरोपी पोलिसांच्या रडारवर आहेत. या प्रकरणातील यापूर्वी अटक केलेल्या आरोपींचा जामीन अर्जावर येत्या सहा मार्च रोजी सुनावणी होणार आहे. तसेच दुसरा आरोपी सीए विजय मर्दा याची लोकाउट नोटीस पोलिसांनी जारी केली असून, त्याचाही पोलीस शोध घेत आहेत.

# कॅन्सरवर नवीन औषधं

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), मद्रास येथील संशोधकांनी कर्करोगाच्या उपचारासाठी भारतीय मसाल्यांच्या वापराचे पेटंट घेतले आहे. सन २०२८ पर्यंत हे औषध बाजारात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. भारतीय मसाल्यापासून तयार केलेल्या नॅनोमेडिसिनमध्ये फुफ्फुस, स्तन, आतडे, ग्रीवा, तोंड आणि थायरॉइड पेशींच्या विरुद्ध कर्करोगविरोधी कृती दिसून आली आहे. त्याचवेळी सामान्य पेशींसाठी ते सुरक्षित असल्याचेही दिसून आले आहे, असे सांगण्यात आले आहे. भारतीय मसाल्यांमध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म असल्याचे यापूर्वीही अनेक अभ्यासकांनी मांडले होते; पण आता आयआयटीच्या संशोधकांनी पेटंट घेतल्यास त्याला वैज्ञानिक अधिमान्यता मिळणार आहे. जगभरात वैद्यकीय उपचारप्रणालींच्या क्षेत्रामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर संशोधने सुरू असूनही आणि त्याला विज्ञान-तंत्रज्ञानाची साथ लाभूनही अनेक दुर्धर व्याधींवरील रामबाण औषध शोधण्यामध्ये आपल्याला यश आलेले नाहीये. चार वर्षांपूर्वी आलेल्या कोरोना महामारीने विषाणूजन्य आजारांची चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली. त्यावेळी अँटी व्हायरल औषधांची निर्मिती करण्यातील मर्यादा लक्षात आल्या. तथापि, अशा आजारांचा मुकाबला करण्यासाठी किंवा ते नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध उपचारपद्धती उपलब्ध आहेत आणि त्या काळानुसार विकसित होत आहेत. अलीकडील काळात जगभरामध्ये कर्करोग, मधुमेह, हृदयविकार या प्रमुख व्याधींनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. यापैकी मधुमेह हा जीवनशैलीजन्य आजार असल्यामुळे त्याच्यावर नियंत्रण मिळवणे एकवेळ शक्य होऊ शकते; परंतु कर्करोगाचे वाढत चाललेले प्रमाण ही अत्यंत चिंतेची बाब ठरत आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणार्यांना कर्करोग होताना पाहायला मिळायचे. त्यामुळे या व्यसनांपासून लांब राहिल्यास कर्करोगाला दूर ठेवता येईल अशी धारणा होती. परंतु गेल्या दशकभरात अशा प्रकारच्या कोणत्याही व्यसनांचा गंधही नसलेल्या असंख्य जणाांन केवळ कर्करागाने गाठलेच नाही तर अनेकांचा बळीही गेला आहे. ग्लोबल बर्डन ऑफ डिसीजच्या मते, आजघडीला जगातील प्रत्येक सहावा मृत्यू कर्करोगामुळे होतो. त्यामुळेच वैद्यकीय क्षेत्रातील संशोधकांपुढे या व्याधीने तगडे आव्हान उभे केले आहे. कोणत्याही प्रकारच्या आजारावर औषध तयार करताना शास्त्रज्ञांना अपरिमित प्रयत्न करावे लागतात. त्याच्या विविध स्तरावर चाचण्या घ्याव्या लागतात. मुळात, विशिष्ट व्याधीवर विशिष्ट घटक प्रभावी ठरेल हे शोधणेच मुळात कठीण काम असते.



यासाठी प्राचीन आरोग्यशास्त्राचा आधार घेतला जातो. आपल्याकडे वर्षानुवर्षे आजीबाईचा बटवा नावाची संकल्पना अस्तित्वात आहे. त्यानुसार सर्दी, पडसे, खोकला, ताप, डोकेदुखी यांसारख्या किरकोळ आजाराजांवर घरामध्ये उपलब्ध असणार्या अन्नघटकांचा वापर करण्याविषयीचे मौलिक मार्गदर्शन केले जाते. यातील प्रत्येक गोष्टीला शास्त्रीय आधार आहे असे नाही. परंतु परंपरागत चालत आलेल्या ज्ञानातून आणि अनुभवातून या आहारघटकांची उपयुक्तता सिद्ध झाल्याचे दिसून आले आहे. उदाहरणच घ्यायचे झाल्यास, स्वयंपाक घरात असणारी हळद. शरीरातील एखाद्या भागाला खरचटण्यावर, कापण्यावर इलाज म्हणून वापरल्या जाणार्या हळदीचा वापर दुधात घालून घेतल्यास खोकल्यासारख्या आजारातही आराम मिळतो. हळदीमधील या औषधी गुणधर्मांना शास्त्रीय मान्यताही लाभली आहे. त्यामुळेच ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी हळदीच्या पेटंटसाठी दीर्घकाळ लढा दिला आणि तो जिंकून अत्यंत मोलाचे कार्य केले. भारतात हजारो वर्षांपासून आयुर्वेद, युनानी किंवा अनेक भागातील जमाती, समाज घटकांतील पारंपरिक पद्धतीत हळदीप्रमाणेच अनेक वनौषधी, अन्नधान्यांचा वापर विविध आजारांवर केला जातो. पण त्यांविषयी आजही मोठ्या प्रमाणावर अनभिज्ञता आहे. वैद्यकशास्त्रातील संशोधनामध्येही याबाबत फारसे मोलाचे काम केले जात नाही. या पार्श्वभूमीवर अलीकडेच समोर आलेली एक बातमी महत्त्वाची आहे. त्यानुसार इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), मद्रास येथील संशोधकांनी कर्करोगाच्या उपचारासाठी भारतीय मसाल्यांच्या वापराचे पेटंट घेतले आहे. सन २०२८पर्यंत हे औषध बाजारात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. भारतीय मसाल्यापासून तयार केलेल्या नॅनोमेडिसिनमध्ये संशोधकांना फुफ्फुस, स्तन, आतडे, ग्रीवा, तोंड आणि थायरॉइड पेशींच्या विरुद्ध कर्करोगविरोधी कृती दिसून आली आहे. सामान्य पेशींमध्ये नॅनोमेडिसिन सुरक्षित असल्याचे आढळले. संशोधक सध्या सुरक्षा आणि किंमतीची समस्या सोडवण्यावर काम करत आहेत. सध्याच्या कर्करोगाच्या औषधांमधील हे सर्वात मोठे आव्हान आहे. मद्रास आयआयटीतील संशोधकांचा प्राण्यांवरील अभ्यास अलीकडेच यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे, ही बाब सकारात्मक म्हणावी लागेल. आता हे औषध बाजारात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने क्लिनिकल चाचण्यांचे नियोजन केले जात आहे. यासंदर्भात आयआयटी-मद्रास येथील रासायनिक अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक आर. नागराजन यांनी दिलेली माहिती मोलाची आहे. त्यानुसार भारतीय मसाल्याच्या तेलांचे औषधी फायदे शतकानुशतके ज्ञात असले, तरी त्यांच्या जैवउपलब्धतेमुळे त्यांचा वापर मर्यादित झाला आहे. कर्करोगाच्या पेशींशी सक्रिय घटक आणि त्यांच्या परस्परसंवादाच्या पद्धती ओळखण्यासाठी यांत्रिकी अभ्यास महत्त्वाचा असून तो आम्ही प्रयोगशाळांमध्ये सुरू ठेवू. त्याचवेळी समांतर पद्धतीने आम्ही प्राण्यांच्या अभ्यासातील सकारात्मक परिणामांना क्लिनिकल चाचण्यांमध्ये त्वरित परावर्तित करण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे ते सांगतात. तसेच आम्ही दोन ते तीन वर्षांच्या कालावधीत हे औषध बाजारात आणण्याचा विचार करत आहोत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. या संशोधनाचे महत्त्व म्हणजे पारंपरिक कर्करोग उपचारपद्धतीपेक्षा नॅनो ऑन्कोलॉजीचे फायदे अधिक आहेतच; पण सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे याचे दुष्परिणाम नाहीयेत. या संशोधन कार्यामध्ये सहभागी असणार्यांच्या मते, पेटंट केलेले भारतीय मसाले आधारित नॅनो-फॉर्म्युलेशन औषध अभ्यासांद्वारे कर्करोगाच्या अनेक सामान्य प्रकारांमध्ये प्रभावी सिद्ध झाले आहे. भारतीय पारंपरिक आहार, त्यासाठी वापरले जाणारे पदार्थ यांचे आरोग्यशास्त्रीय महत्त्व कालातीत आहे. मसाल्यांचा वापर तर असंख्य वर्षांपासून भारतीय आहारात होत आला आहे. हळद, जिरे, मेथी, मोहरी, काळी मिरी, लवंग, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे यांसारख्या मसाल्यांच्या वापराशिवाय भारतीयांचा रोजचा आहार बनतच नाही. अलीकडील काळात त्यांच्या औषधी गुणांविषयी विविध संशोधनांमधून आणि अभ्यासातून माहिती उजागर होऊ लागला आहे, ही बाब आपल्या पूर्वजांच्या ज्ञानाविषयीचा अभिमान वाटणारी आहे. दुर्दैवाने पाश्चिमात्य आहारसंस्कृतीच्या रेट्यात भारतीय आहारपद्धतीचा प्रभाव कमी होत चालला आहे. वस्तुतः, पश्चिमी देशातून आलेल्या फास्टफूडच्या सेवनाच आरोग्यावर असंख्य प्रतिकूल परिणाम होत आहेत. परंतु जाहिरातींच्या मार्यामुळे आणि प्रभावी विपणन कौशल्यामुळे हे पदार्थ आज महानगरांपासून गावाखेड्यांपर्यंत रोजच्या आहारसवयींचा भाग बनत आहेत. या फोफावलेल्या फास्टफूड कल्चरमध्ये भारतीय आहारांचे महत्त्व किती मोठे आहे, हे अशा संशोधनांमुळे जाणवून देण्यास मदत होणार आहे. अर्थात यासंदर्भातील पुढील संशोधनाचे टप्पे आणि पेटंट मिळवण्याची प्रक्रिया पार पडणे आवश्यक आहे. तसेच क्लिनिकल चाचण्या यशस्वी होणे गरजेचे आहे. कारण त्याखेरीज हे औषध खुल्या बाजारात आणण्याची परवानगी मिळणार नाही. तसेच हे अस्सल भारतीय औषध बाजारात येण्याचा मार्ग मोकळा झाल्यानंतर त्याच्या किमतीबाबतही शासनाने सकारात्मक भूमिका घ्यायला हवी. जेणे करुन त्याचा लाभ सर्वांना घेता येईल. हळदीचा लढा असो किंवा आयआयटी चेन्नईच्या संशोधकांना मिळालेले यश असो यातून पुनःपुन्हा पारंपरिक भारतीय आहारपद्धतीचे अनन्यसाधारण महत्त्व समोर येत आहे. त्यामुळे येणार्या काळात त्यावर अधिकाधिक संशोधन होण्याची गरज आहे. विज्ञानाच्या युगात कोणत्याही गोष्टीला शास्त्रीय परीक्षणातून मिळालेल्या यशाचे कोंदण लाभल्याखेरीज त्याला लोकमान्यता मिळत नाही.

## विद्यापीठाच्या परीक्षा लवकरच



मुंबई - मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या उन्हाळी सत्राच्या २९९ परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या या परीक्षा मार्चपासून सुरु होत आहेत. या उन्हाळी सत्र परीक्षेला २ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी बसणार आहेत. विद्यापीठ दरवर्षी चार विद्याशाखेच्या ४५० पेक्षा जास्त परीक्षा घेत असते. विद्यापीठाने २०२३-२४ च्या उन्हाळी सत्राच्या मानव्य विद्याशाखेच्या एकूण ६९ परीक्षा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या ५७ परीक्षा, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या ७५ परीक्षा व आंतर विद्याशाखेच्या ९८ अशा एकूण २९९ परीक्षेच्या तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या परीक्षेच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील. मुंबई विद्यापीठाच्या १ मार्च रोजी झालेल्या परीक्षेत घोळ झाला होता. एमएच्या प्रश्नपत्रिकेत चुकीचा प्रश्नसंच दिला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना दुसऱ्या प्रश्नपत्रिकेसाठी चार तास वाट पाहावी लागली. दुपारी २.३० वाजता प्रश्नपत्रिका मिळाल्यावर विद्यार्थ्यांनी 'भारतची विदेश नीती' या विषयाच्या पेपरमध्ये झालेला घोळ लक्षात आणून दिला. त्यानंतर दुपारी २.३० वाजताचा पेपर ४.४० वाजता सुरु झाला. त्यानंतर संध्याकाळी सात वाजेपर्यंत परीक्षा सुरु होती. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## ठाकरे गटात इनकमिंग

नाशिक : एकनाथ शिंदे यांनी आपल्या समर्थक आमादारांसोबत बंड केलं. तेव्हा त्यांच्यासोबत शिवसेनेचे अनेक नेते शिंदेंसोबत गेले. आमदार खासदारांपासून ते पक्षातील पदाधिकाऱ्यांनीही एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व स्विकारत शिंदे गटात जाणं पसंत केलं. बंडानंतर आतापर्यंत ठाकरे गटातील अनेक नेते एकामागोमाग एक शिंदे गटात सामील झाले. आता पहिल्यांदाच उद्धव ठाकरे एकनाथ शिंदे यांना मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याचं दिसतं आहे. कारण एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेला एक खासदार पुन्हा ठाकरे परतण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणूक तोंडावर आहे. अशात काही पक्षांतरं होतानाही दिसत आहेत. महाविकास आघाडीतील पक्षांचे नेते महायुतीत सामील होताना दिसत आहेत. अशातच आता शिंदे गटातील बडा नेता पुन्हा ठाकरे गटात परतणार असल्याची चर्चा नाशिकच्या राजकीय वर्तुळात होत आहे. कारण खासदार हेमंत गोडसे हे पुन्हा शिवसेना उद्धव ठाकरे गटात येण्याची शक्यता आहे. तशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

## महामार्गाच्या कामात स्थानिकांना रोजगार द्या

नाशिक : समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे आज लोकार्पण होत आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री भुसे यांच्या हस्ते या महामार्गाचे लोकार्पण होणार आहे. समृद्धी महामार्गाचा भरवीर ते इगतपुरी दरम्यानचा हा तिसरा टप्पा आहे. इगतपुरी पथकर प्लाझा येथे मान्यवरांच्या हस्ते कोनशिला अनावरण होणार आहे. मात्र या कार्यक्रमाच्या उद्घाटनाआधीच कार्यक्रमस्थळी अचानक ग्रामस्थ जमल्याने पोलीस (झेश्रळलश) यंत्रणेची मोठी धावपळ उडाली आहे. समृद्धी महामार्गाच्या कामात स्थानिकांना रोजगार द्या, अशी मागणी स्थानिक तरुणांकडून करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गाच्या कामात स्थानिकांना रोजगार द्या, अशी मागणी करत तरुणांनी कार्यक्रस्थळी गर्दी केली आहे. ज्यांच्या जमिनी गेल्या आहते त्यांना कामात सामावून घ्या, तरुणांना रोजगार द्या, अशी मागणी करण्यात आली आहे.

## राज्यात लोकसभा निवडणुकीची काँग्रेसची जोरदार तयारी

मुंबई - लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. निवडणुकांच्या अनुषंगाने हळूहळू सर्वच पक्षांकडून उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येत आहेत. तर महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबतचा तिढा अद्याप कायम आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये जागावाटप अद्याप जाहीर झालेला नसलं तरी काँग्रेस पक्षाने राज्यातील १९ मतदारसंघात जोरदार तयारी सुरू केल्याचे चित्र आहे. मुंबईतील सहा मतदार संघ वगळून उर्वरित महाराष्ट्रातील १९ मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक उद्या म्हणजेच ५ मार्च रोजी मुंबईत बोलावली आहे. या बैठकीत काँग्रेसच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वपूर्ण चर्चा होणार असल्याचे बोलले जात आहे. यात विदर्भातून नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा-गोंदिया, अमरावती, अकोला, यवतमाळ-वाशीम या आठ मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांना बोलावण्यात आले आहे.

# ज्ञान संपादनाबरोबरच श्रमदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे –रमेश पोकळे



**बीड । प्रतिनिधी**
महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ज्ञान संपादन करण्याबरोबरच श्रमदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे. समाजातील तळागाळातील ग्रामीण भागातील विविध प्रश्न विद्यार्थ्यांना कळाव्यात त्यांना सामाजिक बांधिलकीचे महत्त्व समजावे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे अशा विविध शिबिरांचे आयोजन केले जाते. असे प्रतिपादन संस्थाअध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम आणि कम्प्युटर सायन्स बीड आणि संभाजी राजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे कोळवाडी येथे रा.से.यो. विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश पोकळे बोलत होते. या कार्यक्रमाला व्यासपीठावर ह. भ. प. तुळशीदास महाराज शिंदे, जेष्ठ मार्गदर्शक शिवदास आप्पा पोकळे, संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे, प्र.प्राचार्य प्रा.बप्पासाहेब हावळे, सरपंच सौ.द्रौपदी वाघमारे, तलाठी खांदे मॅडम, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक होले सर, यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना रमेश पोकळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना त्यांच्यातील नेतृत्वगुणांना वाव देण्यासाठी रा.से.यो. विभागाचे उत्तम व्यासपीठ आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून उद्याचा राष्ट्राचा चांगला नागरिक समाजाला मिळत असतो. असेही पोकळे म्हणाले. यावेळी ह.भ.प तुळशीदास महाराज शिंदे यांनी उद्घाटनपर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्र.प्राचार्य प्रा.बप्पासाहेब हावळे यांनी शिबीर घेण्यामागचा उद्देश याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पटवारी यांनी केले. तर शेवटी आभार संस्था सचिव प्रा.गणेश पोकळे यांनी मानले. या कार्यक्रमाला शालेय समितीचे अध्यक्ष आबादेव ढेरे,प्रा.राजश्री महाजन, कार्यक्रमाधिकारी प्रा. भूषण मठपती,प्रा. सुहास गाढवे,प्रा. पुजा पाटील, महेश नेवडे, दीपक जाधव, इमरान पठाण, सचिन चौरे, सौ.खोसे विद्यार्थी स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना त्यांच्यातील नेतृत्वगुणांना वाव देण्यासाठी रा.से.यो. विभागाचे उत्तम व्यासपीठ आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून उद्याचा राष्ट्राचा चांगला नागरिक समाजाला मिळत असतो.

## विविध योजनांच्या लाभासाठी आधार संलग्नीकरण सक्तीचे

बीड – बीड डाक विभागाकडून विविध योजनांच्या लाभासाठी आधार संलग्नीकरण सक्तीचे करण्यात आले आहे. या पार्शवभूमीवर जिल्हयात सर्व नागरिकांसाठी आधार नोंदणी मोहीम राबविण्यात येत आहे. बीड हेड पोस्ट ऑफिस अंबाजोगाई, परळी (त) पोस्ट ऑफिस परळी ढ्झड पोस्ट ऑफिस, पाटोदा, गेवराई, कडा, माजलगाव आणि चौसाळा पोस्ट ऑफिस येथे आधार संलग्नीकरण करण्यात येणार आहे. जिल्हातील सर्व डाकघरे आणि शाखा डाकघरे हे जनतेला सेवा देण्यासाठी सदैव अग्रेसर आहे तरी सर्व जनतेने आधार नोंदणी मोहीमेचा लाभ घ्यावा असे आवाहन अधिक्षक डाकघर, बीड विभाग बीड यांनी सर्व न्ररिकांना केले आहे.

## जेष्ठ नागरिकांकरीता वयोश्री योजना

बीड – राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करण्यासाठी तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. व्दारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार शासन मान्यता देण्यात आलेली आहे. योजनेचे स्वरुप:- सदर योजनेअंतर्गत पात्र वृध्द लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता/ +दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने/ उपकरणे खरेदी करता येतील.तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक विभागाव्दारे नोंदणीकृत करण्यात आलेले तसेच राज्य शासनाव्दारे नोंदणी करण्यात आलेल्या योगोपचार केंद्र,मन:स्वास्थ केंद्र,मनशक्ती केंद्र येथे सहभागी होता येईल. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या यंत्रणेमार्फत त्या विभागाच्या सर्वेक्षणासोबत(पॉप्युलेशन बेस्ड स्क्रिनिंग व माझे कुटुंब माझी जबाबदारी अभियानांतर्गत होणारे सर्वेक्षण) या योजनेच्या लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येईल. लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे आहे :- लाभार्थ्यांचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक हवे पडताळणीकरीता स्वीकारार्ह असेल असे आधार कार्ड हवे. पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड/राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेंतर्गत किंवा राज्य/केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेन्शन योजनेंतर्गत वृध्दपकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक.

## योजनांचा लाभ घ्या –गर्जे

बीड – सौर कृषी पंप योजना ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर आणि सोयीस्कर योजना



असून ज्या शेतकरी बांधवांनी सौर पंप आपल्या शेतात बसवले आहेत त्यांच्या उत्पन्नात ३०% वाढ झाली असून रात्री अपरात्री पिकांना पाणी देण्याची गरज राहिली नाही आणि वीज बिल पण भरण्याची गरज नाही.जे शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले आहेत त्यांच्या साठी सरकारने पुन्हा नव्याने ८५००००/- सौर पंप देण्याची घोषणा केली आहे. जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी महावितरण मार्फत राबविण्यात येणाऱ्या सौर पंप योजनेचा लाभ घ्यावा योजनेसाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड, बँक पासबुक, १००रु बाँड, पासपोर्ट फोटो, ७/१२,८ अ ई. कागदपत्रे जमा करून आपला अर्ज त्वरित ऑनलाईन करून घ्यावा.महावितरण मार्फत लवकरात लवकर आपला अर्ज मंजूर करून त्वरित अंमलबजावणी होत आहे. सोलार पंप बसवुन देण्यासाठी मी आपली मदत करणार असून आवश्यक कागदपत्रे घेऊन आपला अर्ज ऑनलाईन करून घ्या ही विनंती. सर्व खर्चाच्या पावत्या शेतकरयांना मिळणार आहेत या सोबत ऑनलाइन आपल्याला प्राप्त होणार आहेत जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सादर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन गर्जे यांनी केले आहे. उद्देश असून सर्व मदत शेतकरी बांधवाना माझ्या मार्फत करण्यात येणार असून त्यात सर्वांनी या योजनेचा लाभ घ्यावा ही विनंती. १५ दिवसात हे सोलार पंप आपल्या शेतात येणार असून ही योजना कुणीही सोडू नये असे आवाहन गर्जे यांनी केले आहे.

# राज्यातील लोकशाही वाचविण्यासाठी मतदारांनो सत्ताधाऱ्यांना तडीपार करा

**परळी । प्रतिनिधी**
अच्छे दिनाचे स्वप्न दहा वर्षांपूर्वी सत्ताधाऱ्यांनी दाखवून देशातल्या जनतेला



पेट्रोल डिझेल गॅस विविध जीवनावश्यक वस्तू , खते बी बियाणे कीटकनाशके औषधी व विविध उद्योग कारखान्यावरील उत्पादक वस्तूवर जीएसटीकर लावून जनतेची आर्थिक लूट करून ६४ उद्योगपतीला कर्ज माफ केले , देशात महागाईचा माध्यमातून जनतेची लूट केली जात असून विरोधात असणाऱ्या प्रमुख पक्षांच्या नेत्यावर सर्व स्तरावरील कायदा हाताशी धरून सीबीआय, ईडी, एसीबी धाडी टाकून प्रेस मीडियाच्या माध्यमातून सर्व देशातील जनतेला वेठीस धरण्याचा कार्यक्रम सत्ताधारी राबवित असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . विकासासाठी केंद्रा मधील विविध पक्षाच्या सरकारने देशावर ६७ वर्षात जेवढे कर्ज घेतले होते त्यापेक्षा १००/पट अधिक कर्ज सत्ताधाऱ्यांनी १० वर्षात करून ठेवलेले असून देशाची जीडीपी आर्थिक स्थिती नाजूक केली आहे. केंद्र सरकारने कोल इंडिया, एमटीएनएल, आयआयटी, बीएसएनएल,आय आयएम अँड सी, बीपीसीएल, गन फॅक्टर ,भेल, एचपी, ओईपी, एलआयसी,रेल्वे, विमानसेवा विविध बंदरे, विद्युत पुरवठा, धाराई झोपडपट्टी पुनर्वसन,असे अनेक प्रकल्पांचचे खाजगीकरण करून मित्रांना विकून टाकले असून सर्व मित्रांना सर्वस्तरावर आर्थिक मदत करून जगाच्या श्रीमंतच्या यादीमध्ये नंबर १ आणण्याचे मोठे पाप सत्ताधाऱ्यांनी केले आहे. शेतकऱ्याच्या शेतीमालावर निर्यात बंदी करून शेतकऱ्याच्या शेती मालाचे खूप मोठे नुकसान केले आहे . राष्ट्रीयकृत विविध बँकाचे खाजगीकरण करून एसबीआय व आरबीआय वर दबाव तंत्राचे नियंत्रण आणून उद्योगपतींना कर्ज दिले. सत्ताधाऱ्यांचे देशातील शेतकरी, व्यापारी, कामगार ,जवान , सर्व जनतेला हतबल करण्याचा मोठे षडयंत्र आखून संविधान व लोकशाहीला धोक्यात घालण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले आहे शेतीमालाला भाव नाही सुशिक्षितबेकार मुलांना नोकरी व रोजगार नाही विविध आंदोलने विविध विषयावर जनतेने उभे केले ते दडपण्यासाठी सर्व स्तरावर शासकीय यंत्रणा लावून कायदेद्वारे गुन्हे नोंद करून हिटलरासारखे अहंकाराने सत्ताधारी वागत असून जनतेने मतदान रुपी परिवर्तन करण्यासाठी सत्ताधाऱ्याला तडीपार करण्याचे आव्हान काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केले . ५००,१०००,२०००च्या नोटावर बंदी करून जनतेला वेठीस धरले व परदेशातील जहाजामध्ये अनेक वेळा ड्रग्स व नशाचे साहित्य पकडले त्यावर कारवाई केली नाही.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनात प्रशासकीय अर्ज प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**
जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे ०३ प्रशासकीय अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी महसूल, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरावस्था

**बीड । प्रतिनिधी**
बीड तालुक्यातील च-हाटा येथील जिल्हा वार्षिक योजना २०१४-१५ अंतर्गत ८ वर्षांपासून ५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची ईमारत रोहित्र न बसवल्याने वीजे अभावी शोभेची वस्तु बनली असुन विद्युत पुरवठा नसल्याने अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी रहात नसुन कुठल्याही प्रकारच्या आंतररूग्ण सुविधा, शस्त्रक्रिया आदि सुविधा उपलब्ध नसल्याने रूग्णांची हेळसांड होत असुन आर्थिक भुर्दंड सहन करत उपचारासाठी बीडला यावे लागत असुन तातडीने विद्युत रोहित्र बसविण्यात यावे.तसेच आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी वारंवार गैरहजर रहात असल्याने रूग्णांची गैरसोय होत असुन संबंधित प्रकरणी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा उपाययोजना न केल्याने संबंधित जबाबदार



आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी तसेच च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी वारंवार गैरहजर रहात असुन संबंधित प्रकरणात चौकशी करून कारवाई करण्यात यावी. यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दि.४ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्यमंत्री, आरोग्य सचिव, ऊर्जामंत्री, पालकमंत्री बीड यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात आदि सहभागी होते. बीड तालुक्यातील मौजे.च-हाटा या ठिकाणी जिल्हा वार्षिक योजना सन २०१४-१५ अंतर्गत ५ कोटी रुपये खर्च करून टोलेजंग प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली असुन रोहित्र बसविण्यात आले नसल्याने ईमारत विजेअभावी शोभेची वस्तू बनुन राहिली आहे. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या इमारतीला रोहित्र न बसवल्याने विद्युत पुरवठा नसल्याने अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नाहीत.त्यामुळे डिलिव्हरी, शस्त्रक्रिया तसेच आंतररूग्ण आदि सुविधा उपलब्ध नाहीत.त्यामुळे रूग्णांची गैरसोय होत आहे.

## आ.सुरेश धसांच्या हस्ते आरोग्य मोहिमेचा शुभारंभ

**आष्टी । प्रतिनिधी**
आष्टी शहरातील भीमनगर येथे टाकळसिंग प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत राबविण्यात आलेल्या ३ मार्च रोजी नवजात बालकांना ‘ दो बुंद हर बार ‘ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प केला असून २०२५ पर्यत देश पोलिओ मुक्त या अभियानाला प्रतिसाद देत पोलीओ लसीचा डोस विधानपरिषद आ.सुरेश धस यांच्या हस्ते देऊन पोलिओ लसीकरणाला सुरुवात करण्यात



आली. आष्टी येथील बौद्ध विहार येथे लसीकरण मोहिमेचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.३ मार्च रोजी आरोग्य मंत्रालय महाराष्ट्रद्वारे आयोजित पल्स पोलिओ लसीकरण मोहीम प्राथमिक आरोग्य केंद्र टाकळसिंग अन्तर्गत आष्टी शहराबरोबर एकूण ८ उपकेंद्र मध्ये येणाऱ्य ६० ठिकाणी बूथ लावण्यात आले होते.देशभर पल्स पोलीओचे नवजात पालक ते पाच वर्षाच्या बालकांना हा डोस देण्यात आला. आष्टी तालुक्यात आरोग्य यंत्रणाचे डॉक्टर आणि अन्य कर्मचारी यांच्या नियोजनात हे काम करण्यात आला.

# राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराचे पुणे येथे होणार वितरण

**आष्टी । प्रतिनिधी**
आष्टी तालुक्यातील मूळगाव दादेगाव येथील सध्या पुणे येथे डेटा सायंटिस्ट या पदावर कार्यरत असलेले किरण नागरगोजे यांना बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी संघाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार जाहीर झाला असून त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतल्याने संघाच्या संस्था एका प्रदेशाध्यक्ष सौ. लक्ष्मीबाई गरकळ यांनी जाहीर केला आहे वतीने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या पुरस्कार वितरण येत्या ६ मार्च



रोजी चाकण चौक आळंदी देवाची जिल्हा पुणे येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. आष्टी तालुक्यातील दादेगाव येथील किरण नागरगोजे यांनी डेटा सायंटिस्ट म्हणून काम करत असताना बऱ्याच प्रोजेक्टवर काम केलेले आहे ज्याच्यामुळे बँकिंग आणि इतर सेक्टरना टेक्निकली फायदा झालेलाच असून मेडिकल सेक्टरमध्ये ड्रग डिस्कव्हरी म्हणजे नवीन औषधाची निर्मिती आर्टिफिशियल इंटेलिजन्स करू शकता कमी वेळामध्ये नवीन नवीन औषधांचा शोध आपण लावू शकतो तेच गोष्ट माणसांना लॅब मध्ये करायची असेल तर एक औषध निर्मितीसाठी जवळजवळ आठ ते दहा वर्ष ट्रायल्स घ्यावे लागतात .आणि मग ते फायनल कन्क्लूजनला येतो परंतु आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच -ख हे काम कमी वेळामध्ये नवीन औषध निर्मिती करू शकतो यासाठी प्रयत्न केले आहेत.त्यांच्या या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याची दखल संस्थेने घेई किरण नागरगोजे यांना समाज रत्न पुरस्कार दिला आहे. बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी संघाच्या संस्थापक अध्यक्षा लक्ष्मीताई गरकळ यांनी जाहीर केला असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते वितरण होणार असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कळमनुरीचे आमदार संतोष बांगर, बुलढाणा माजी आमदार कायंदे, मानव कल्याण मिशन संस्थापक तुळशीराम गुट्टे महाराज, कांचन कुमार चाटे, काँग्रेस सरचिटणीस मुंडे, अविनाश बुधवंत, मुंडे, राजेंद्र राख,महादेव दराडे यांच्या उपस्थितीत वितरण करण्यात येणार आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com